# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.07.2025** **वारःरविवार**

---

१.पंतप्रधान नरेन्द्र मोदी आज तमिळनाडूमध्ये चोल सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या जयंती सोहळ्यात आणि आदि तिरुवतिरई महोत्सवात सहभागी होणार

२. भारत आणि मालदीवदरम्यान विविध क्षेत्रातील सहकार्य करारांसह द्विपक्षीय संबंधांना बळकटी

३. पंतप्रधान आज आकाशवाणीवरुन करणार मन की बात

४. छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत चार माओवादी ठार

५. फिडे महिला विश्व करंडक स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यातील पहिली फेरी बरोबरीत, आज दुसरी फेरी होणार

**<u>पीएमतामिळनाडू</u>**

पंतप्रधान नरेन्द्र मोदी आज तमिळनाडूमध्ये चोल वंशातील महान सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या समारंभात तसंच गंगईकोंडा चोलपुरम मंदिरात होणाऱ्या आदि तिरुवतिरई महोत्सवातही सहभागी होणार आहेत. भारतात होऊन गेलेल्या थोर सम्राटांपैकी एक असलेल्या राजेंद्र चोल प्रथम यांच्या स्मरणार्थ जारी करण्यात आलेल्या नाण्याचं प्रकाशनही पंतप्रधानाच्या हस्ते होणार आहे. राजेंद्र चोल यांनी आग्नेय आशियात आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी त्यांनी हाती घेतलेल्या प्राचीन सागरी मोहिमेला तसंच चोल वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या गंगईकोंडा चोलपूरम मंदिराच्या बांधकामाला सुरुवात केल्याच्या घटनेलाही एक हजार वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त तिथं महोत्सावाचं आयोजन करण्यात आलं आहे. आग्नेय आशियातील दिग्विजयानंतर त्यांनी गंगईकोंडा चोलपूरम इथं आपली राजधानी वसवली होती. या मंदिराचा युनेस्कोच्या वारसास्थळाच्या यादीत समावेश आहे.

तत्पूर्वी पंतप्रधान मोदी काल मालदीव दौरा आटोपून थेट तमिळनाडूतील तुतिकोरीन इथं पोहोचले. तिथं त्यांनी तुतीकोरिन विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन केलं. तसंच ४ हजार ८०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि उद्घाटन देखील केलं.

**<u>पीएम</u>**

दरम्यान, आपला मालदीव दौरा अत्यंत यशस्वी झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मालदीवच्या स्वातंत्र्यदिनाच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मालदीवचे

अध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइझ्झू यांनीही मोदींचा हा दौरा महत्त्वाचा असल्याचं सांगून द्विपक्षीय संबंधांच्या भविष्याला एक नवा आकार देणारा असल्याचं  म्हटलं आहे.

भारत आणि मालदीव मत्स्यव्यवसाय, हवामानशास्त्र, डिजिटल पायाभूत सुविधा इत्यादी अनेक क्षेत्रात करार करून त्यांचे द्विपक्षीय संबंध मजबूत करत असतानाच भारतानं मालदीवच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ४ हजार ८५० कोटी रुपयांचा पतपुरवठा करण्याची घोषणा केली. याशिवाय, दोन्ही देशांनी आर्थिक संबंध आणि द्विपक्षीय व्यापार मजबूत करण्याच्या उद्देशाने मुक्त व्यापार करारावर वाटाघाटी सुरू केल्या आहेत.

यंदा उभय देशांमधील राजनैतिक संबंधांच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त  विशेष टपाल तिकिटही जारी केलं आहे. दोन्ही देशांनी संरक्षण आणि सागरी सुरक्षा सहकार्य आणखी मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारतासोबत असल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी राष्ट्रपती मुइझ्झू यांचे आभार मानले.

**<u>मकीबा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १२४ वा भाग असेल. हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजएअर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**<u>करगिल</u>**

भारतीय सैन्याच्या शौर्याची, धैर्याची आणि बलिदानाची आठवण म्हणून काल देशभर २६ वा करगिल विजय दिवस मोठया अभिमानानं आणि देशभक्तीच्या उत्साहानं साजरा करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह सर्व संरक्षण दलांच्या प्रमुखांनी या युद्धात वीरमरण आलेल्या शूर सैनिकांना अभिवादन केलं.

**<u>थायलंडकंबोडिया</u>**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी कंबोडिया-थायलंड सीमेवरील संघर्षाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी उभय देशांना युद्धबंदीबाबत तात्काळ सहमती दर्शवण्याचे आणि संवादाद्वारे वाद सोडवण्याचे आवाहन केलं  आहे. गुटेरेस यांनी आपल्या समाज माध्यम संदेशाद्वारे दोन्ही राष्ट्रांमधील वादाच्या शांततापूर्ण निराकरणासाठी आपण उपलब्ध असून शांततापूर्ण तोडगा काढण्याकरता मदत करण्यास तयार असल्याचं म्हटलं आहे .

तत्पूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही काल थायलंड आणि कंबोडियाच्या पंतप्रधानांशी संपर्क साधून त्यांना संघर्ष थांबवण्याचं आवाहन केलं. युद्धबंदी जाहीर न केल्यास अमेरिका या दोन्ही

देशांसोबतचा व्यापार थांबवेल अशी धमकी ट्रम्प यांनी दिली. दरम्यान कंबोडिया आणि थायलंड यांच्यात काल तिसऱ्या दिवशीही चकमक सुरु होती. त्यामध्ये बळी पडलेल्यांची संख्या ३३ झाली आहे.

**छ.गड-नक्षली**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत किमान चार माओवादी ठार झाले. ठार झालेल्या या माओवाद्यांचे मृतदेह मिळाले असून सुरक्षा दलाच्या सैनिकांनी घटनास्थळावरून त्यांच्याकडे असलेली शस्त्रं हस्तगत केली आहेत. जिल्ह्याच्या नैऋत्य भागात माओवादी सक्रिय असल्याची माहिती गुप्तचरांकडून मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी त्या भागात शोध मोहीम सुरू केली होती. ही मोहीम सुरू असताना माओवादी आणि सुरक्षा दलांच्या सैनिकांदरम्यान जोरदार गोळीबार झाला.

**संसदरत्न**

सतरा खासदारांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नवी दिल्लीत एका स्वयंसेवी संस्थेद्वारे यावर्षीचे संसदरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातल्या वर्षा गायकवाड, सुप्रिया सुळे आणि अरविंद सावंत या खासदारांचा समावेश आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी हा पुरस्कार म्हणजे खासदारांच्या उत्कृष्ट कामगिरीला मिळालेली पोचपावती असल्याचं सांगून त्या सर्वांचं अभिनंदन केलं.

**अमरनाथ**

जम्मू आणि काश्मीरमध्ये अमरनाथ यात्रा सुरळीतपणे सुरू असून कडक सुरक्षा व्यवस्थेत, २ हजार १९७ यात्रेकरूंची २५ वी तुकडी जम्मूमधील भगवती नगर बेस कॅम्पमधून काश्मीर खोऱ्याकडे रवाना झाली. आज पहाटे १०० वाहनांमधून हे सर्व यात्रेकरू मार्गस्थ झाले. ५७३ यात्रेकरू पहाटे साडेतीन वाजता बालताल शिबिराकडे तर १ हजार ६२४ यात्रेकरू पहाटे ४ वाजता पहलगाम शिबिराकडे रवाना झाले.

**गोवा**

ज्येष्ठ राजकीय नेते आणि माजी केंद्रीय मंत्री पुष्पती अशोक गजपती राजू यांनी काल गोव्याचे नवे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

**दुर्घटना**

महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यातल्या अलिबाग नजीक खांदेरी किल्ल्याजवळ काल रात्री मासेमारी बोट बुडाली. या बोटीवर 8 खलाशी होते. त्यातील 5 जण पोहत किनाऱ्यावर आले मात्र ३ जण बेपत्ता आहेत. बेपत्ता खलाश्यांचा शोध सुरू आहे. मुसळधार पावसामुळे शोध कार्यात अडचणी येत आहेत. पोहत आलेल्या 5 जणांना अलिबाग इथल्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. मासेमारीस बंदी असतानाही ही बोट समुद्रात गेली होती..

**फिडे**

जॉर्जियात बटुमी इथं फिडे महिला विश्व करंडक स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यातील पहिला गेम काल बरोबरीत राहिला. पहिल्या फेरी बरोबरीत राहिल्यानं दोघींनाही अर्धा गुण देण्यात आला आहे.  दुसरा गेम आज होऊन विजेता ठरेल. या स्पर्धेच्या इतिहासात अंतिम लढतीमध्ये दोन्ही भारतीय खेळाडू असल्यानं भारतासाठी हा एक अद्भुतक्षण आहे.

**<u>क्रिकेट</u>**

मँचेस्टर इथल्या चौथ्या कसोटीत भारताच्या दुसऱ्या डावात चौथ्या दिवसअखेर २ बाद 174 धावा झाल्यामुळं मालिकेत बरोबरी साधण्याची भारताला संधी आहे. भारताला विजयासाठी अद्याप 137 धावांची गरज आहे. दुसऱ्या डावात 311 धावांचं उद्दिष्ट घेऊन खेळताना भारताचे पहिले दोन गडी पटपट बाद झाले. कर्णधार शुभमन गिल आणि के एल राहुलनं खिंड लढवत भारतासाठी विजयाची आशा निर्माण केली आहे.

**<u>तिरंदाजीपदक</u>**

जर्मनीमध्ये सुरू असलेल्या जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत भारतानं काल एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदकं पटकावली. तिरंदाजीत भारताच्या साहिल जाधवनं वैयक्तिक सुवर्ण पदक मिळवलं, तर महिलांमध्ये परनीत कौर हिनं रौप्य पदक मिळवलं. तिहेरी उडीत राष्ट्रीय विक्रमाची नोंद करणाऱ्या प्रवीण चित्रावेल यानंही रौप्य पदक मिळवलं.

**<u>हवामान</u>**

पश्चिम मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान आणि गुजरातमध्ये आज अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुढील ३ दिवसांत मध्य भारत आणि पश्चिम किनारपट्टी भागात तसंच घाट माथ्यावर मौसमी पाऊस सक्रिय राहण्याचा अंदाज आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.